# महाराष्ट्र शासन
## महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना
## राज्य आरोग्य हमी सोसायटी

जीवनदायी भवन, राज्य कामगार विमा रुग्णालय आवार, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०१८

दूरध्वनी क्र- ०२२- २४९९९२०३/०४/०५ Email ID : dyceo@jeevandayee.gov.in

जा. क्र. राआहसो/उमुकाअ/कोविड-१९/ ६००/२०२० दिनांक ०५.०६.२०२०

प्रति,

**मा. जिल्हाधिकारी (सर्व)**

विषय - महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत कोणत्याही प्रकारचे रेशन कार्ड नसलेल्या कुटुंबाना तहसिलदारांकडून देण्याच्या दाखल्याचा नमुना

संदर्भ – महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक रास्वयो – २०२०/ प्र.क्र.८०/आरोग्य-६ दिनांक २३ मे २०२०

महोदय,

संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे कोविड १९ रुग्णांना अंगीकृत खाजगी रुग्णालयामध्ये उपचार घेण्यासाठी आर्थिक बोजा पडू नये तसेच कोविड१९ महामारीच्या संकटामध्ये सर्वच नागरिकांना आरोग्यविषयक हमी व आर्थिक दिलासा मिळावा यासाठी मर्यादित कालावधीसाठी योजनेची व्याप्ती वाढवण्यात आली आहे. योजनेच्या अंतर्गत दि. ३१ जुलै, २०२० पर्यंत शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबांचा समावेश करण्यात आला आहे.

या शासन निर्णयानुसार जर रुग्ण किंवा त्याचा नातेवाईक कोणत्याही प्रकारचे रेशन कार्ड सादर करु शकत नसल्यास अशा नागरीकांना तहसिलदार यांचा दाखला व अधिवास प्रमाणपत्र यापैकी कोणतेही एक कागदपत्र पुरावा म्हणून सादर करावे लागेल. त्यानुसार तहसिलदार कार्यालयाने द्यावयाचा दाखल्याचा मसुदा प्रपत्र १ येथे सोबत जोडला आहे. दाखला प्राप्त होताच त्या कुटुंबाची नोंदणी करुन त्यास योजनेचा लाभ देता येईल. लाभार्थ्याने अधिवास प्रमाणपत्र सादर केल्यास लाभार्थ्यास एक घोषणापत्र सादर करावे लागेल त्याची प्रत प्रपत्र २ येथे सोबत जोडली आहे.

तहसिलदार यांचा दाखला व अधिवास प्रमाणपत्र यापैकी कोणतेही कागदपत्र योजनेच्या लाभासाठी ग्राह्य धरण्यात येणार असल्याने याबाबत आपल्या अंतर्गत सर्व तहसिलदार यांना सूचना द्याव्यात ही विनंती. सदर नमुने जीवनदायी योजनेच्या **www.jeevandayee.gov.in** संकेतस्थळावर Operational Guidelines अंतर्गत Declaration and Tahsildar Certificate या लिंकवर उपलब्ध करण्यात आले आहेत.

आपली विश्वासू,

(डॉ. ज्योत्स्ना पडियार)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी
राज्य आरोग्य हमी सोसायटी

प्रत माहितीसाठी:
मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, गो. ते. रुग्णालय आवार, नवीन मंत्रालय, मुंबई

# तहसिलदार दाखला

असे प्रमाणित करण्यात येते की अर्जदार श्री/श्रीमती ..................................................................वय ..................राहणार....................................तालुका.........................................जिल्हा...........................मोबाईल क्रमांक.............................. हे/ या महाराष्ट्राचे/ च्या रहिवासी असून त्यांच्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाही. सदर व्यक्ती या पत्यावर दिनांक ....................पासून राहत असून त्यांचा अधिवास दाखला/रहिवासी प्रमाणपत्र तपासण्यात आले असून ते वैध आहे. त्यांच्या कुटुंबामध्ये एकूण ...........सदस्य असून त्यांची नावे, वय व कुटुंब प्रमुखाशी नाते खालीलप्रमाणे आहे.

| **क्र** | **सदस्याचे नाव** | **वय** | **कुटुंब प्रमुखाशी नाते** |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

वरील तक्त्यामध्ये एखाद्या कुटुंब सदस्याचे नाव नमूद करावयाचे राहिल्यामुळे तो सदस्य योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास सदर कुटुंबाचे कुटुंबप्रमुख जबाबदार असतील. सदरचे प्रमाणपत्र हे शासन निर्णय क्रमांक रास्वयो-२०२०/प्र.क्र.८०/आरोग्य/६ दि. २३ मे २०२० मध्ये नमूद केल्याप्रमाणे महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ मिळविणे करिता देण्यात आले आहे.

स्थळ :                                        (तहसिलदार यांचे नाव, सही व शिक्का)

# घोषणापत्र

मी श्री/श्रीमती ..................................................................वय ..................राहणार....................................... ...............................................तालुका.........................................जिल्हा.......................................मोबाईल क्रमांक..............................असे नमूद करतो / करते की माझ्या कुटुंबाकडे कोणत्याही प्रकारची शिधापत्रिका नाही. माझ्या कुटुंबामध्ये एकूण .............सदस्य असून त्यांची नावे, वय व कुटुंब प्रमुखाशी नाते खालीलप्रमाणे आहे.

| क्र | सदस्याचे नाव | वय | कुटुंब प्रमुखाशी नाते |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

वरील तक्त्यामध्ये एखाद्या कुटुंब सदस्याचे नाव नमूद करावयाचे राहिल्यामुळे तो सदस्य योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास किंवा कुटुंबाचा सदस्य नसलेल्या व्यक्तीचे नाव नमूद केल्याचे आढळल्यास त्यास पूर्णपणे मी जबाबदार असेन व दिलेली माहिती चुकीची आढळल्यास शासनाची फसवणुक केल्याबद्दल माझ्यावर फौजदारी कारवाई करण्यात येईल याची मला पूर्ण जाणीव आहे.

आपला/आपली विश्वासू

(कुटुंबातील सदस्याचे पूर्ण नाव व स्वाक्षरी/ डाव्या हाताचा अंगठा )